


दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : ३१, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.१५ सप्टेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# आरक्षणाबाबत मोठी बातमी: सरकारविरोधात दोन मोर्चे काढणार



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१४, पुणे :** राज्यात आरक्षणाच्या मुद्द्यावर 'अशी ही बनवाबनवी' चित्रपट सुरू असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मराठा व ओबीसी समाजाची बनवाबनवी करत आहेत, अशी टीका काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी रविवारी पुण्यात केली.

मराठा समाजाला इतर मागास प्रवर्गातून (ओबीसी) आरक्षण देण्यासाठी हैदराबाद गॅझेटची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य सरकारने दबावापोटी मराठा आरक्षणाबाबत शासन निर्णय काढला आहे. त्या पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या ओबीसी सेलतर्फे पुण्यात काँग्रेस भवन येथे ओबीसी संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक घेण्यात आली. पक्षाच्या ओबीसी विभागाचे अध्यक्ष अनिल जयहिंद, आमदार वडेट्टीवार व सतेज पाटील, सेलचे राज्य अध्यक्ष भानुदास माळी यांच्यासह पक्षाचे सर्व पदाधिकारी माजी आमदार व माजी नगरसेवक उपस्थित होते.

या बैठकीनंतर विजय वडेट्टीवार व अनिल जयहिंद यांनी पत्रकारांशी संवाद साधताना राज्य सरकारवर टीकेची झोड उठवली. 'राज्य सरकार समाजाला मूर्ख बनवत असून सर्वांचे वाटोळे करत आहे. या निर्णयामुळे ओबीसी समाजाचे प्रतिनिधित्व हिसकावून घेतले गेले असून, या गरीब समाजाला आरक्षणाचे संरक्षण राहील का, असा सूर उमटत आहे. ओबीसी तरुणांच्या आत्महत्यांचे सत्र सुरू झाले आहे. त्यामुळे आम्ही रस्त्यावरची लढाई आणि न्यायालयीन लढाई लढण्याचा निर्धार केला आहे. त्यासाठी १० ऑक्टोबरला नागपूर आणि २० ऑक्टोबर रोजी संभाजीनगर येथे ओबीसी समाजाच्या मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यासाठी महायुती सरकारमधील मंत्री छगन भुजबळ यांच्याशीही आम्ही चर्चा करत असून त्यांनी या मोर्चात सहभागी व्हावे,' असे आवाहनही त्यांनी केले.

तत्पूर्वी, ओबीसी समाजाला योग्य आरक्षण देण्यासाठी जातनिहाय जनगणनेचा तेलंगणा पॅटर्न महाराष्ट्राने लागू करावा, अशी मागणी अनिल जयहिंद यांनी केली.

**भाजप दुतोंडी गांडूळ !**

'पहलगाम दहशतवादी हल्ल्याची घटना घडल्यानंतरही भारत पाकिस्तान क्रिकेट सामन्यांना प्रोत्साहन देणारा भारतीय जनता पक्ष दुतोंडी गांडूळ असून, त्याच्या दोन्ही बाजूला तोंड व शेपूट आहे. हा सामना पाहण्यासाठी जाणाऱ्या व जल्लोष करणाऱ्यांचा देशात अगरबत्ती व धूप लावून यथोचित सत्कार केला पाहिजे,' असा निशाणाही वडेट्टीवार यांनी भाजप नेत्यांवर साधला.




## लग्नाबाबत वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्या लक्ष्मण हाकेंना अखेर मोठा दणका



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१४, बीड :** राज्यात पुन्हा एकदा मराठा आरक्षणाचा मुद्दा चांगलाच तापला आहे, मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईमधील आंदोलनानंतर सरकारने राज्यात हैदराबाद गॅझेट लागू करण्यासंदर्भात जीआर काढला, या जीआरला ओबीसी समाजाकडून प्रचंड विरोध होत आहे. मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण नको, स्वतंत्र आरक्षण द्या, अशी ओबीसी समाजाची भूमिका आहे. त्यामुळे या जीआरनंतर पुन्हा एकदा ओबीसी समाज आणि मराठा समाज आमने-सामने आल्याचं पहायला मिळत आहे.

दरम्यान मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्ष नको अशी मागणी ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी केली आहे. याच सर्व पार्श्वभूमीवर हाके यांनी बीड जिल्ह्यातल्या गेवराई तालुक्यातील शिंगारवाडी फाटा येथे सभेचं आयोजन केले होते, या सभेत बोलताना त्यांनी मराठा समाजातील मुलींच्या लग्नाबाबत वादग्रस्त वक्तव्य केलं, या वक्तव्यानंतर हाके यांच्याविरोधात मराठा समाज चांगलाच आक्रमक झाला असून, त्यांना इशारा देण्यात आला आहे.

दरम्यान हाके यांना हे वादग्रस्त वक्तव्य आता चांगलंच भोवलं आहे. मराठा समाजातील मुलींबाबत वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्या लक्ष्मण हाके यांच्या विरोधात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गोपाल शिंदे यांच्या तक्रारीवरून तलवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## राज्यसरकारसह शेतकऱ्यांची फसवणूक केल्यास पुन्हा राज्यभर पेरू वाटप आंदोलन करणार



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१४, सुपा :** शेतकरी हा देशाचा कणा आहे आणि शेतरस्ता हा शेतकऱ्याचा श्वास आहे. गावागावात, वाडीवस्तीवर दर्जेदार शेतरस्त्यांचे जाळे उभारल्याशिवाय महाराष्ट्रातील शेतकरी समाधानी होणार नाही, असे स्पष्ट मत महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी व्यक्त केले. हजारो-लाखो शेतकरी पिढ्यानपिढ्या शेतरस्त्यासाठी प्रशासकीय व न्यायालयीन लढा देत आहेत. शेतरस्ता हा केवळ दळणवळणाचा मार्ग नसून तो शेतकऱ्यांच्या आर्थिक स्वातंत्र्याचा व सन्मानाचा अविभाज्य भाग आहे. परंतु प्रशासकीय समन्वयाचा अभाव, न्यायालयात दीर्घकाळ चालणारे वाद, तसेच कार्यालयीन हेलपाटे यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक, मानसिक आणि शारीरिक नुकसान होत आहे. यामुळे काही ठिकाणी फौजदारी स्वरूपाच्या घटना देखील घडू लागल्या आहेत. या पार्श्वभूमीवर शिव पाणंद शेतरस्ता चळवळीच्या आंदोलनामुळे शासनाचे लक्ष वेधले गेले. छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयाने ६० दिवसांच्या आत शेतरस्ते खुले करून हद्द निश्चिती करण्याचे आदेश दिले. त्यानंतर राज्य शासनाने नवा शासन निर्णय काढून ९० दिवसांच्या आत रस्ते खुले करण्याचे, निशुल्क मोजणी व संरक्षण देण्याचे आदेश दिले. त्यानुसार प्रत्येक गावात ग्रामसभा, गावशिवार फेरी, लोक अदालत आयोजित करून शेतरस्त्यांची नोंद घेणे आणि प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याच्या स्पष्ट सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. काही जिल्ह्यांत या आदेशांची अंमलबजावणी उत्तम प्रकारे सुरू असली तरी अनेक ठिकाणी काम केवळ कागदोपत्री राहिले आहे. काही ठिकाणी फाईल्स हलताना दिसतही नाहीत, अशी गंभीर टीका पवळे यांनी केली.

शेतकऱ्यांची फसवणूक आम्ही सहन करणार नाही. शासन निर्णयांची प्रामाणिक अंमलबजावणी न करणाऱ्या निष्क्रिय अधिकाऱ्यांची तक्रार वरिष्ठ पातळीवर केली जाईल. जे अधिकारी पारदर्शकतेने काम करत आहेत त्यांचा चळवळीतून सन्मान केला जात आहे. मात्र, जैसे थे भुमिकेत असलेल्या अधिकाऱ्यांविरुद्ध राज्यभर आंदोलन छेडले जाईल, असा इशारा पवळे यांनी दिला.

> **निवडणुकांनंतरचा थेट ईशारा !**
>
> आगामी निवडणुका होताच चळवळीच्या पदाधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष अंमलबजावणीचा अहवाल घेऊन तो राज्य सरकारकडे सादर केला जाईल. आणि त्याचवेळी निष्क्रिय अधिकाऱ्यांच्या कार्यालयांवर भव्य पेरू वाटप आंदोलन करून शासन-प्रशासनाचे लक्ष वेधले जाईल.
>
> **- शरद पवळे**
> **(प्रणेते, महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळ)**

## भारत विरुद्ध पाकिस्तान क्रिकेट सामना घेण्याचा बीसीसीआयचा संतापजनक निर्णय



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, पुणे :** भारत विरुद्ध पाकिस्तान क्रिकेट सामना घेण्याचा बीसीसीआयचा निर्णय हा देशातील शहीदांच्या बलिदानाचा अपमान असून अत्यंत संतापजनक आहे. पाकिस्तान हा देश गेल्या कित्येक वर्षांपासून भारतात दहशतवाद घडवून आणतोय. २६ भारतीय महिला, शेकडो जवान आणि हजारो निरपराध नागरिक पाकिस्तानी दहशतवादामुळे हकनाक बळी गेले. अशा परिस्थितीत भारत सरकारने पाकिस्तानला कधीच प्रोत्साहन देऊ नये. परंतु बीसीसीआयचे अध्यक्ष जे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे सुपुत्र आहेत, त्यांच्याकडून संवेदनशीलतेची अपेक्षा होती. मात्र भारत मातेच्या वीरांच्या बलिदानाचा विचार न करता त्यांनी पाकिस्तानविरुद्धचा सामना खेळविण्याचा निर्णय घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑपरेशन सिंधूर मोठ्या थाटामाटात राबवले, पण पाकिस्तानच्या विरोधात ठोस पावले उचलताना ते दिसत नाहीत. देशासाठी प्राणार्पण करणाऱ्या शहीदांच्या कुटुंबियांचा अपमान होत असताना फक्त दिखावा करणारे कार्यक्रम राबवले जातात.

जर भारत-पाक सामना झाला, तर तो केवळ भारत मातेच्या वीर मुलांचा आणि वीरांगनांचा अपमान ठरेल. त्यामुळे हा सामना तात्काळ रद्द करावा, अशी ठाम मागणी आम आदमी पार्टी, पुणे शहराध्यक्ष प्रशांत कांबळे, सा.न्या. विभाग यांनी केली आहे.

## नवी मुंबई विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव दिल्याशिवाय उदघाटन होऊ देणार नाही




**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.१४, शहापूर (ठाणे) :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते स्व.दि.बा.पाटील यांचे नाव देण्यासाठी राज्य सरकार बरोबरच इतर राजकीय पक्ष, संघटना व स्थानिक भूमिपुत्र सकारात्मक असतानाही केंद्र सरकार त्याकडे दुर्लक्ष करत असून विमानतळाला दि.बा पाटील यांचे नाव देण्याबाबत जाणीवपूर्वक चालढकल व वेळकाढू पणा करत आहे.

मात्र जोपर्यंत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते स्वर्गीय दिबा पाटील साहेबांचे नाव देण्यात येत नाही तोपर्यंत या विमानतळाचे उद्घाटन होऊ देणार नाही असा इशारा भिवंडी लोकसभा मतदार संघाचे खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी केंद्र सरकारला दिला आहे. बुधवारी पत्रकार परिषदेत ते बोलत होते. लोकनेते स्व.दि.बा.यांचे समाज कार्य केवळ नवी मुंबई किंवा ठाणे पालघर जिल्ह्यापुरती मर्यादित नव्हते तर दि.बा. पाटील यांच्यामुळे देशात स्त्री भ्रूण हत्या कायदा पारीत झाला, प्रकल्प ग्रस्त शेतकऱ्यांना जमिनीच्याया बदल्यात जमीन अथवा भरीव मोबदला देण्याचे कार्य देखील त्यांनी केले असून देश स्वातंत्र्यापूर्वी त्यांनी कुळ कायदा करण्यासाठी इंग्रजांविरोधात आंदोलन केले यावेळी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या आंदोलनाची दखल घेतली होती, देश स्वातंत्र्यानंतर कुळ कायदा मंजूर झाला ज्याचा फायदा आज देशातील सर्व शेतकऱ्यांना होत आहे. ओबीसी आरक्षणासाठी देखील दि.बा.पाटील यांचे मोठे योगदान आहे. दि.बा.पाटील हे पाच वेळा आमदार, दोन वेळा खासदार, राज्याच्या विधान सभेचे विरोधी पक्षनेते असा त्यांचा राजकीय, सामाजिक व कृषी क्षेत्रात मोठे योगदान आहे. ते केवळ ठाणे पालघर जिल्ह्या पुरती मर्यादित नसून एक थोर समाज सुधारक म्हणून त्यांच्याकडे पहिले पाहिजे आणि त्यासाठीच नवी मुंबई विमानतळाला त्यांचे नाव द्यावे अशी आमची मागणी असल्याची माहिती खा.बाळ्या मामा यांनी दिली आहे. रविवारी १४ सप्टेंबर रोजी लोकनेते स्व.दि.बा.पाटील यांची जन्मशताब्दी वर्ष असून या निमित्त नवी मुंबई विमानतळाला त्यांचे नाव मिळावे यासाठी व त्यांना अभिवादन करण्यासाठी भिवंडी ते नवी मुंबई जासई गाव अशी भव्य कार रॅली काढण्यात आली असून या कार रॅलीत किमान दोन हजारांहून अधिक चार चाकी गाड्या असणार आहेत.या कार रॅलीत ठाणे,पालघर,रायगड,नवी मुंबई,मुंबई येथून हजारोंच्या संख्येने आगरी कोळी बांधव उपस्थित राहणार आहेत. हि कार रॅली केंद्र सरकारला जागे करण्यासाठी असणार असून हा केवळ ट्रेलर आहे, आम्हाला पिच्चर दाखवायला भाग पाडू नका, जो पर्यंत विमानतळाला नाव देणार नाही तो पर्यंत विमानतळाचे उदघाटन होऊ देणार नाही असा इशारा देखील खासदार बाळ्या मामा यांनी केंद्र सरकारला दिला आहे.

## बांधकाम कामगारांना गावीच साहित्य द्या, अन्यथा मनसे रस्त्यावर

**अक्षराज : कैलास राठोड**

**दि.१३, किनवट (नांदेड) :** तालुक्यातील बांधकाम व इतर नोंदणीकृत कामगारांना मिळणाऱ्या भांडे संचासाठी नांदेड येथे तीन वेळा चकरा मारायला लावूनही संच न मिळाल्याने कामगार त्रस्त झाले आहेत. या संदर्भात मनसेचे जिल्हाध्यक्ष रवि राठोड यांनी आक्रमक भूमिका घेत कामगारांच्या गावी जाऊनच साहित्य वाटप करा, अन्यथा मनसे रस्त्यावर उतरेल असा इशारा दिला आहे.कामगारांना भांडे संच देण्यासाठी सहाय्यक कामगार आयुक्त व त्यांच्या पुरवठादाराने वारंवार नांदेड येथे बोलावले, मात्र प्रत्यक्ष संच न दिल्याने कामगारांची फसवणूक झाली. प्रवासाचा खर्चच भांड्यांपेक्षा अधिक होत असून महिला-पुरुष कामगारांची हेळसांड होत असल्याची बाब समोर आली आहे.या पार्श्वभूमीवर जिल्हाध्यक्ष राठोड यांनी सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयात धडक देत ठेकेदारास वठणीवर आणण्याची भूमिका घेतली. कामगारांच्या गावीच साहित्य वाटप केले नाही, तर मनसे आपल्या शैलीत रस्त्यावर उतरून कारवाई करेल, असा इशारा त्यांनी दिला.यावेळी कॉम्रेड गंगाधर गायकवाड, अर्थ मीडियाचे संचालक नकुल चव्हाण, जिल्हा उपाध्यक्ष योगेश्वर मोरे, कामगार जिल्हाध्यक्ष धम्मपाल आढाव, मनसे सैनिक सुरज यांच्यासह मोठ्या संख्येने बांधकाम कामगार उपस्थित होते.

## महावितरणच्या गलथान कारभाराचा शेतकऱ्याला जबरी फटका ; बोरीत १ एकर ऊस जळून खाक



**अक्षराज : स्वप्नील जावळे**

**दि.१३, खंडाळा (सातारा) :** बोरी तालुका खंडाळा येथील शेतकरी अशोक दिनकर शेडगे यांच्या मालकीची शेती गट नंबर ४३३ मधील क्षेत्रात १ एकर ऊस पीक केले होते.याच शेतातून महावितरणच्या विद्युत वाहक तारा ओढलेल्या होत्या.

या विद्युत वाहक तारा एकमेकांना चिकटत होत्या सदर तारा एकमेकांना घासून स्पर्किंग होऊन ठिणगी उडाली व क्षनार्धात या आगीने रुद्र रूप धारण केले व ऊस पीकाने पेट घेतला. वाऱ्यामुळे आग वेगाने पसरली आणि संपूर्ण एक एकर ऊस जळून खाक झाला आहे. याबाबत शेतकरी अशोक शेडगे यांनी अशी माहिती दिली की माझ्या ४३३ गट नंबर मधील शेतात विद्युत तारा एकमेकांना घर्षण होत आहेत व तारेची स्पार्किंग होत आहे तरी आपण या ठिकाणी उपाययोजना करावी अशी वारंवार मागणी शेतकऱ्यांनी वायरमन यांच्याकडे केले असताना देखील वायरमेन कोल्हे यांनी या शेतकऱ्याने केलेल्या मागणीकडे दुर्लक्ष केले त्यामुळे आज या ठिकाणी ऊस या पिकाचे प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या शेतकऱ्याने शेतीसाठी घेतलेले कर्ज आता भरायचे कसे हा एक्ष प्रश्न शेतकऱ्यांपुढे निर्माण झालेला आहे.तरी या आगीमध्ये झालेल्या पिकाची नुकसान भरपाई महावितरणकडून मिळावी अशी मागणी या शेतकऱ्यांने यावेळी बोलताना व्यक्त केली आहे.

# संपादकीय

## अभियंता

आज १५ सप्टेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो कारण भारतातील पहिले अभियंता भारतरत्न सर मोक्षगुडम विश्वेश्वरय्या यांचा हा जन्मदिवस. मोक्षगुडम विश्वेश्वरय्या हे केवळ अभियंता नव्हते तर ते थोर देशभक्तही होते. आजच्या दिवशी म्हणजे १५ सप्टेंबर १८६१ रोजी कर्नाटकातील कोलार जिल्ह्यातील मदनहल्ली या छोट्याश्या गावात त्यांचा जन्म झाला. मोक्षगुडम विश्वेश्वरय्या यांचे वडील विद्वान संस्कृत पंडित होते. घरची परिस्थिती हलाखीची होती तरीही त्यांनी विश्वेश्वरय्या यांच्या शिक्षणात खंड पडू दिला नाही. विश्वेश्वरय्या यांनीही गरिबीशी झुंज देत तालुक्याला एकटे राहून आपले शिक्षण अव्वल गुणांनी पूर्ण केले. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते उच्च शिक्षणासाठी बंगळुरुला आले. तिथेही त्यांनी विशेष गुणवत्ता मिळवत बी ए केले. पदवीधर झाल्यावर त्यांना तांत्रिक शिक्षणाची आवड निर्माण झाली. पण तांत्रिक शिक्षण घेण्यासाठी पैसे नसल्याने त्यांनी म्हैसूरच्या राजाला विनंती केली. म्हैसूरच्या राजाने त्यांच्यातील गुणवत्ता हेरून त्यांना अभियांत्रिकी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन पुण्याला पाठवले. विश्वेश्वरय्या यांनीही त्यांच्यावरील विश्वास सार्थ ठरवत अभियांत्रिकी परीक्षेत मुंबई प्रांतात प्रथम क्रमांक पटकावला.

या त्यांच्या यशाची दखल घेऊन १८८४ साली सरकारने त्यांना सहाय्यक अभियंता या पदावर नेममुक दिली. तिथेही त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. या काळात त्यांनी खडकवासला धरणासाठी एक अभिनव अशा स्वयंचलित गेटची निर्मिती केली. यामुळे विशिष्ट पातळी वरील अतिरिक्त पाणीच वाहून जाई. अशाप्रकारच्या गेटची निर्मिती भारतात पहिल्यांदाच झाली होती. या डिझाइनचे नाव पुढे विश्वेश्वरय्या गेट असे झाले. १९०७ साली त्यांनी सरकारी नोकरीतून निवृत्ती पत्करली. निवृत्तीनंतर निजाम सरकारने त्यांची विशेष सल्लागारपदी नियुक्ती केली. तिथे त्यांनी हैदराबाद परिसरातील दोन नद्यांवर धरणे बांधून हैदराबाद शहर पुरमुक्त केलेच शिवाय शहराचा कायापालट देखील केला. म्हैसूरच्या राजाने त्यांना मुख्य अभियंता पदाची ऑफर दिली त्यांनी ती स्वीकारली. म्हैसूरचे मुख्य अभियंता असताना त्यांनी तिथे कृष्णराज सागर धरण, वृंदावन गार्डन बांधले तसेच विकासाची अनेक कामे केली. या व्यतिरिक्त त्यांनी उद्योग व शेती सिंचनाची अनेक कामे केली. पाण्याचा अपव्यय टाळून पुरेपूर वापर करणारी ब्लॉक सिस्टीम ही त्यांचीच देणगी आहे. म्हैसूरचे पद सोडल्यावर त्यांनी अभियांत्रिकीच नव्हे तर उद्योग, शेती, नगर सुधारणा या योजनेत मोलाचे कार्य केले.

विश्वेश्वरय्या हे उच्चविद्याविभूषित असूनही त्यांचे राहणीमान अतिशय साधी होती. म्हैसूरी पद्धतीचा फेटा आणि साधी वेशभूषा त्यांनी शेवटपर्यंत जपली. त्यांचे व्यक्तिमत्त्वही आकर्षित करणारे होते. ते जितके साधे होते तितकेच ते परखडही होते. अंधश्रद्धा त्यांना मान्य नव्हती. मानवात देव आहे. मानव सेवा हीच ईश्वर सेवा असे त्यांचे मत होते. ते जसे बोलत तसे ते वागतही होते. वयाच्या ९४ व्या वर्षी भारत सरकारने त्यांना भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने गौरविले. विश्वेश्वरय्या हे शतायुषी होऊन निरामय जीवन जगले. १४ एप्रिल १९६२ रोजी वयाच्या १०१ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. पण त्यांनी केलेल्या कार्यकर्तृत्वाचा गौरव व्हावा म्हणूनच आजचा दिवस संपूर्ण देशात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो. विश्वगुडम विश्वेश्वरय्या यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# आश्वासनांच्या ढिगाऱ्याखाली गाडलेला राज्यातील अन्नदाता...!!



महाराष्ट्रात शेतकरी आत्महत्या हा विषय दशकानुदशके चालत आलेला आहे. विदर्भआणि मराठवाडा हे दोन भाग तर आत्महत्यांची केंद्र बनली आहेत. येथे शेतकरी एका हंगामाच्या पिकावर जगतो, ते पीक जर नासले तर त्याचे जीवन उद्ध्वस्त होते. सध्या महायुती सरकारच्या काळात ही शोकांतिका अधिक तीव्र होत चालली आहे. काँग्रेसचे वरिष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी नुकतीच समाजमाध्यमांवरून सरकारवर जोरदार टीका केली. त्यांनी स्पष्ट शब्दात म्हटले की, महायुती सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफीचे गोडवे गायले, त्यांच्या भोळ्या भाबड्या विश्वासाचा गैरफायदा घेतला आणि निवडणुकीत मते मिळवली, पण प्रत्यक्ष सत्तेत आल्यावर हे वचन पूर्ण करण्यात पूर्णपणे अपयशी ठरले. याचा थेट परिणाम म्हणजे केवळ आठ महिन्यांत तब्बल १ हजार १८३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. यात पश्चिम विदर्भातील ७०७ आणि छत्रपती संभाजीनगर विभागातील ५२० शेतकरी आहेत. वडेट्टीवार यांच्या दाव्याचा विचार करता, महाराष्ट्रात दररोज सुमारे पाच शेतकरी आत्महत्या करतात.

शेतकरी आत्महत्यांच्या मागील मूळ कारणे अनेक आहेत. शेती हा व्यवसाय आजही पावसावर अवलंबून आहे. पाऊस वेळेवर आणि प्रमाणात पडला तर शेतकऱ्याला थोडा दिलासा मिळतो, पण पावसाचा नादुरुस्त पॅटर्न शेतकऱ्याचे जीवन उद्ध्वस्त करतो. एका बाजूला अतिवृष्टी तर दुसऱ्या बाजूला पावसाची टंचाई, गारपीट, वादळ अशा नैसर्गिक आपत्तींचा शेतकऱ्याला सामना करावा लागतो. यामुळे पिकांचे नुकसान होते आणि उत्पन्नावर पाणी फिरते. याच वेळी उत्पादन खर्च वाढतो. बियाणे, खते, कीटकनाशके, डिझेल, मजुरी या सर्व गोष्टींच्या किमती सातत्याने वाढत आहेत. पण बाजारात मिळणारा भाव तसाच स्थिर किंवा अनेकदा किमान हमीभावापेक्षा कमी असतो. अशा परिस्थितीत शेतकरी कर्ज घेतो, तेही अनेकदा बँक आणि खासगी सावकार या दोन्हीकडून. बँकांचे कर्ज न मिळाल्यास सावकारांच्या दरवाजावर धाव घ्यावी लागते आणि तेथे व्याजाचा दर इतका जास्त असतो की कर्जाचा डोंगर वाढत जातो. या सगळ्या आर्थिक घुसमटीबरोबर सामाजिक दबावही शेतकऱ्याला पेलावा लागतो. कुटुंबाची जबाबदारी, मुलांचे शिक्षण, विवाह, वैद्यकीय खर्च हे सर्व हातातल्या पैशाशिवाय भागवणे अशक्य होते. गावोगावी प्रतिष्ठेचे राजकारण आहे. शेतकरी आपल्या मुलांना, पत्नीला, घराला जगवण्यासाठी कर्ज घेतो, पण पिके निघाली नाहीत की तो समाजात तोंड दाखवण्यासही लाजतो. अशा परिस्थितीत आत्महत्या हा एकमेव मार्ग शिल्लक राहतो. राजकारण या शोकांतिकेत महत्त्वाची भूमिका बजावते. निवडणुकीत प्रत्येक पक्ष शेतकऱ्यांचे गोडवे गातो. महायुती सरकारनेही त्याला अपवाद केला नाही. त्यांनी संपूर्ण कर्जमाफीचे आश्वासन दिले.

शेतकऱ्यांनी या वचनावर विश्वास ठेवला आणि मोठ्या संख्येने महायुतीला मते दिली. परंतु सत्तेत सत्तेत आल्यावर महायुतीने तोंड फिरवले. शासनाच्या मते, संपूर्ण कर्जमाफी देणे शक्य नाही, फक्त अत्यंत अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना मदत केली जाईल. त्यासाठी समिती नेमण्यात आली, ज्याचा अहवाल अद्याप आलेला नाही. ही भूमिका म्हणजे सरळसरळ फसवणूक आहे. शेतकरी या आश्वासनाच्या भरवशावर बँकेकडे कर्जाची परतफेड पुढे ढकलत होते. आता जेव्हा सरकारने कर्जमाफी नाकारली, तेव्हा त्यांच्यावर परतफेडीचा डोंगर कोसळला. बँका आणि सावकारांच्या दडपणाखाली ते आत्महत्या करत आहेत. महायुती सरकारने दिलेली इतर आश्वासनेही तशीच धूळ खात पडली आहेत. मृत शेतकऱ्यांच्या कुटुंबांना तात्काळ मदत मिळेल असे सांगितले गेले, पण प्रत्यक्षात मदत मिळण्याआधी कुटुंबांना शेकडो कागदपत्रे जमा करावी लागतात. पात्रता निकष इतके कठोर ठेवले आहेत की अनेक कुटुंबे मदतीपासून वंचित राहतात. 'लाडकी बहीण' योजनेतून महिलांना मासिक आर्थिक मदत मिळेल असे सांगण्यात आले होते, पण निधीअभावी त्यात अडथळे निर्माण झाले. सिंचन प्रकल्प राबवले जातील, पाण्याचे योग्य नियोजन होईल असेही आश्वासन दिले गेले होते, पण प्रत्यक्षात कोणताही ठोस बदल झाला नाही. शेतकऱ्यांची सर्वात मोठी मागणी असलेली किमान आधारभूत किंमतीवर कायदेशीर हमी याबाबतही कोणतीही पावले उचलली गेली नाहीत. थोडक्यात, सरकारला शेतकऱ्यांच्या जीवनमरणाशी काहीही देणेघेणे नाही. निवडणुकीत मते मिळवून सत्ता मिळाल्यावर त्यांना शेतकऱ्यांच्या व्यथा विसरायला वेळ लागत नाही. आत्महत्यांचा आकडा हे सरकारच्या अपयशाचे मोठे प्रमाणपत्र आहे. आज शेतकऱ्यांसाठी मानसिक आरोग्य सल्ला केंद्रे, समुपदेशन सुविधा, आधार गट यांची गरज आहे. परंतु याकडे कोणी लक्ष देत नाही. सरकारला शेतकरी हा फक्त निवडणूक जिंकण्याचे साधन वाटतो. या सर्व परिस्थितीत उपाययोजना दोन प्रकारच्या असायला हव्यात. तात्काळ आणि दीर्घकालीन. तात्काळ उपाययोजनांत त्वरित कर्जमाफी, नुकसानभरपाई वेळेवर मिळणे, विमा दावे तातडीने मंजूर होणे, मृत शेतकऱ्यांच्या कुटुंबांना अडथळ्यांशिवाय मदत मिळणे यांचा समावेश होतो. दीर्घकालीन उपाययोजनांत सिंचन व्यवस्थेचा विकास, पावसावर अवलंबून असलेल्या भागांना स्थायी जलस्रोत उपलब्ध करून देणे, उत्पादन खर्च कमी करण्यासाठी अनुदान देणे, पिकांच्या किमतीत स्थिरता आणण्यासाठी किमान हमीभावावर काटेकोर अंमलबजावणी, शेतमाल थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याची बाजारपेठ उपलब्ध करून देणे यांचा विचार करावा लागेल.



कव्हर स्टोरी

- शिवाजी विठ्ठल चौगुले.
कागल-कोल्हापूर..

# जागतिक पटलावर भारतीय लोकशाहीला मानाचे स्थान, लोकशाहीमुळे अंतिम सत्ता लोकांच्या हाती

## वाचक पत्र

लोकशाही म्हणजे अशी शासनप्रणाली, जिथे अंतिम सत्ता लोकांच्या हाती असते आणि नागरिक थेट किंवा प्रतिनिधींच्या माध्यमातून या सत्तेचा वापर करतात. लोकशाही म्हणजे लोकांनी, लोकांच्या हिताकरिता, लोकांकरवी चालवलेले राज्य यात सामान्यतः स्पर्धात्मक निवडणुका, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि मानवी हक्कांचे संरक्षण या गोष्टींचा समावेश असतो. आपल्याकडे समान नागरी कायदा नाही, विशीष्ट वर्गासाठी आरक्षण आहे.

हे बरोबर का चुक हा प्रश्न वेगळा पण यांमुळे मुलांना लहानपणापासूनच वेगळा धर्म, वेगळी जात यांची ओळख होते ही वस्तुस्थिती आहे. व पुढे राष्ट्रीय भावना मोठी होण्यापेक्षा माझा फायदा मोठा ही भावना रुजायला वेळ लागत नाही.

व्यक्ती पेक्षा समाज आणि समाजापेक्षा राष्ट्र महत्वाचे आहे हे न समजणारे व्यक्ती स्वातंत्र्यवाले राष्ट्राला विनाशाकडे नेत आहेत असे म्हंटले तरी वावगे ठरणारं नाही अभिव्यक्ती स्वातंत्र्य नागरिकांना आपले विचार मांडण्याचे आणि व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य असते. मानवी हक्कांचे संरक्षण नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे आणि स्वातंत्र्याचे संरक्षण केले जाते. सद्या अतिशय वेगाने सोशल मीडियाच्या प्लॅटफॉर्मवरुन विविध पोष्ट व्हायरल केल्या जातात मात्र आपल्याला लिहिण्याचे, बोलण्याचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे म्हणून काहीपण आक्षेपार्ह मजकूर प्रसिद्ध करता




कमा नये घटनेने आपल्याला अधिकार दिलेत म्हणून आपण काहीही करु शकतो हि भावना धोकादायक ठरु शकते त्यासाठी कायद्यांच्या अधिन राहुन आपण टिकाटिपणी केली पाहिजे वदंगाच्या घटना घडू नयेत यासाठी एक जबाबदार नागरीक म्हणून काळजी घेतली पाहिजे.

जागतीक पटलावर सर्वात मोठी लोकशाही म्हणून भारताकडे पाहिले जाते मात्र राजकारणी याचा दुरुपयोग करतात याची वेळोवेळी प्रचिती येते ते कुठेतरी थांबले पाहिजे आपल्या देशासारखी लोकशाही जगाच्या पाठीवर कुठेही नसेल असे वाटते त्यासाठी आपले अधिकार आणि कर्तव्ये पाळली तर लोकशाही फार सुंदर आणि निकोप होवून भारत बलशाली होण्यास उभारी मिळेल !

**- राजू जाधव**
**मांगूर जि. बेळगांव**

# कायद्यापुढे मॅन पावर चालतो, ना मनी पावर चालतो

ज्या घरामध्ये भरपूर युवकांची, तरुणांची आणि वयस्कर माणसांची संख्या आहे, ज्यांच्या घरातील बहुतांश सदस्य शासकीय व निमशासकीय पदावर विराजमान आहेत, भरपूर पगारीचे हक्कदार आहेत. त्यांच्याकडे भरपूर जमीन जुमला तसेच गाडी व बंगला आहे. म्हणून अशा श्रीमंत व मॅन पावर असणाऱ्या म्हणजेच पैशाने व जनशक्तीने मोठ्या असणाऱ्या घराच्या नादी लागायला गावातील माणसे घाबरतात आणि त्यांच्यासोबत वादविवाद करायला टाळतात. गावातील कोणत्याच माणसाची त्यांच्या वाटेला जायची हिंमत होत नाही. अशा सर्व बाजूंनी म्हणजेच साम, दाम, दंड, भेद यांनी भक्कम व मजबूत असणाऱ्या घराच्या नादी लागणे म्हणजे स्वतःचा पराभव करून घेण्यासारखे आहे. असे बहुतांश लोकांचे धोरण झालेले आहे. म्हणून आजकालची माणसे मॅन पावर व मनी पावर बघूनच भांडण तंटे करायला निघतात. पैशाने व जनशक्तीने समोरची पार्टी मजबूत व भक्कम असेल तर माणसे माघार घेणेच पसंत करतात. कारण त्यांना असे वाटते की, आपण जर अशा धनदांडग्या व श्रीमंत घराच्या नादी लागलो तर आपला पराभव निश्चितच आहे. आपण पोलीस स्टेशन मध्ये त्यांच्या विरोधात गुन्हा जरी नोंद केला तरी समोरची पार्टी पैशाच्या जोरावर अटकपूर्व जामीन घेऊन सुटते. त्यांच्याकडे एकतर जनशक्ती असल्यामुळे बेदम मार खाऊन पराभव पत्करावा लागतो. कारण आजकाल ज्यांच्याकडे मॅनपावर व मनी पावर आहे त्यांचाच विजय आहे. असे आज कालच्या लोकांचे ठाम मत झाले आहे. म्हणून आजकाल ज्या घरामध्ये धनशक्ती व जनशक्तीची सांगड आहे, त्याच घराचा दरारा गावामध्ये व समाजामध्ये आहे. पण मित्रहो ज्या घरांमध्ये जनशक्ती व धनशक्ती मोठ्या प्रमाणात आहे. म्हणून तुम्ही त्या घराला जर घाबरत असाल तर तुम्ही खरंच शिक्षण शिकून न शिकल्यासारखे आहात, असेच म्हणावे लागेल. तुम्ही एवढे शिकूनही जर तुम्हाला भारतीय संविधानाचा व कायद्याचा अभ्यास नसेल तर मग तुमच्या त्या शिक्षणाला काय चुलीत घालायचे आहे? आपला भारत देश भारतीय संविधानावर चालतो. ज्याला भारतीय संविधानाचा व कायद्याचा परिपूर्ण अभ्यास आहे आणि जो भारतीय संविधान पूर्णपणे जाणतो तो कितीही मोठा वाघ असू द्या किंवा कितीही मोठा पहिलवान असू द्या, त्याला जराही न घाबरता त्याच्यासोबत कायदेशीर लढाई लढतो. ज्या माणसांना कायद्याचे नॉलेज नाही, ज्यांना कायदा म्हणजे काय आहे? हे अजूनही कळाले नाही. असे लोक मॅन पावर व मनी पावर असणाऱ्या धनशक्ती व जनशक्तीला घाबरतात. त्यांना कायद्याचे परिपूर्ण नॉलेज नसल्यामुळे आणि कायद्यातील एकंदरीत कलमा माहित नसल्यामुळे ते अशा धनदांडग्या लोकांच्या विरोधात केस करायला घाबरतात. त्यांना वाटत असते की, हे आपल्याला नंतर मारतील, गावात फिरणे व जगणे मुश्किल करतील असे त्यांना वाटत असते. ही त्यांची चुकी नसून त्यांच्या अज्ञानाची व त्यांच्या अल्पशिक्षणाची चुकी आहे. असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. कारण शिक्षण शिकलेल्या माणसाला कायद्याचा थोडातरी अभ्यास असतोच. आणि त्या व्यक्तीच्या मागे भलेही मनी पावर किंवा मॅन पावर जरी नसला तरी ते पोलीस स्टेशनला, कोर्टाला व पेशा करायला कधीच घाबरत नाहीत. त्यांच्यावर अन्याय अत्याचार होत असेल, त्यांच्यावर कोणी जबरदस्ती करत असेल तर ते पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करून कोर्टात कायदेशीर लढायला लागतात आणि आरोपीला शिक्षा देण्यास भाग पाडतात. समोरच्या पार्टीकडे कितीही पैसा असू द्या पण फिर्यादी जर खंबीर व संविधानाचा अभ्यासक असेल आणि त्याला कायदा कानून माहीत असेल तर तो या लढाईत जिंकल्याशिवाय राहत नाही. कारण कायद्यापुढे ना पैसा कामाला येतो ना माणसे कामाला येतात. न्यायालयात न्यायाधीश भारतीय संविधानानुसार आरोपीला शिक्षा व अन्याय झालेल्या व्यक्तीला न्याय देऊन निर्दोष सुटका केली जाते. कोर्टात व न्यायालयात पैसा कामाला येतो ना वशिला. आपण जाणून आहोत की, कायद्याच्या कचाट्यात अडकलेले मोठमोठे महारथी जसे की, सलमान खान, संजूबाबा, अजय देवगन, आसाराम बापू आणि इतर अनेक मोठ्या हस्ती तसेच मोठमोठे राजकारणी कोट्याधीश व अब्जाधीश असून सुद्धा त्यांना जेलची हवा खावी लागत आहे. कायद्यापुढे पैसा कामाला येत असता तर ते पैशाच्या जोरावर कधीच सुटले असते परंतु कायद्यापुढे ना पैसा चालतो ना माणसे चालतात. भारतीय घटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे ना धनशक्ती होती ना जनशक्ती होती, त्यांना पदोपदी जातीयतेचे विखारी चटके सहन करावे लागले. महार जातीचा असल्यामुळे त्यांचा अमानुष छळ केला गेला. काही समाज वगळता अख्खा देश बाबासाहेबांच्या विरोधात होता तरीसुद्धा बाबासाहेब डगमगले नाहीत, जराही खचले नाहीत किंवा त्यांना घाबरून पळाले नाहीत. नित्यनेमाने व सातत्याने आपले काम करतच राहिले. बाबासाहेबांना ना भावकी होती ना त्यांच्याकडे मुबलक पैसा होता. सगळा समाज बाबासाहेबांच्या विरोधात असताना सुद्धा बाबासाहेब इथल्या मनुवादी, जातीवादी व सनातनी विचारधारेच्या लोकांना कायद्याचा दणका देऊन समतावादी व मानवतावादी जीवन जगायला शिकवले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एकटेच होते आणि निम्म्याहून अधिक देश बाबासाहेबांच्या विरोधात होता तरीसुद्धा बाबासाहेब जराही डळमळले नाहीत किंवा ध्येयापासून विचलित झाले नाहीत. मनुवादी, जातीवादी व धर्मांध लोकांच्या छाताडावर पाय देऊन या देशात सर्वधर्मसमभाव जपणाऱ्या भारतीय संविधानाची निर्मिती करून या देशाला जगात आदर्श व महासत्ता बनवले आहे...

**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता. अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

## आत्मा...

जरा चूक अनावधाने
त्वरे मागा राजीनामा
आंदोलने मोर्चे चाले
काम मिळे बिनकामा

खरीचं केली का चूक
कोणकरे खातरजमा
कंठाळ्या बसत राहो
वाजवतरहावे डमामा

विषया पोचवा सर्वत्र
करे नादध्वनी दमामा
घोळात आणून शब्दां
बरोब्बर करावा मामा

विपर्यास अर्था अनर्थ
शिस्तीतद्यावा मुलामा
योग्य वेळी मस्त संधी
कामा लावावे गुलामा

उचित समयी ठिणगी
स्फोटकव्यापगोदामा
सारासार विचार नको
निद्रिस्त ठेव अंतरात्मा

सद्विचार फिरकू नयेत
वेळोवेळी करा खात्मा
नसे फिकीर पश्चात्ताप
कधीचं विकलाआत्मा

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

अक्षराज अचूक वेध, अचूक बातमी

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## पालम शहरात विजेच्या धक्क्याने तिघांचा मृत्यू, तिघे जखमी








**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.१४, पालम (परभणी) :** पालम शहरातील बालाजी नगर येथे रविवार, दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी साडेपाच च्या सुमारास भीषण दुर्घटना घडली असून विजेचा तीव्र धक्क्याने तिघांचा मृत्यू झाला. तर तिघे गंभीर जखमी असून जखमेवर उपचार सुरू आहेत. या दुर्दैवी घटनेमुळे पालम शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे. शहरातील बालाजी नगर येथील शेख शफीक शेख मुसा वय ३१ यांची पानटपरी होती. दिनांक १४ सप्टेंबर रोजी त्यांनी ही टपरी बैलगाडीतून घरी आणून खाली उतरवत असताना, यावेळी टपरी घसरून बैलगाडीवरील लोखंडी दांडी वर होऊन थेट ते ३३ केव्ही विजेच्या तारेला स्पर्श झाल्याने क्षणातच विजेचा जोरदार प्रवाह दांडीतून पसरला आणि दुर्घटना घडली.

या दुर्घटनेत सिद्धार्थ नरहरी बावळे वय ३५, रा.जवळा, ता.पालम, शेख शफीक शेख मुसा वय ३१, आणि शेख शौकत शेख मुसा वय ४०, रा.बालाजी नगर, पालम यांना विजेचा जबर धक्का बसला. तिघांना तत्काळ पालम उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असता तपासणी दरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. याच अपघातात शेख फरहान शेख महेबूब वय १६, रा.पालम, शेख अशेफ, शेख शाखेर वय १८, रा.पालम व शेख असलम शेख गुड्डू वय ३२ रा.आयेशा कॉलनी, पालम हे तिघे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर सध्या लोहा येथील साई हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. या दुर्दैवी घटनेमुळे मृतांच्या कुटुंबीयांवर शोककळा पसरली असून परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

## तरुणाईला थ्रीडी मॉडेल फोटोचे लागले वेड




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१४, अहिल्यानगर :** सोशल मीडियावर रोज नवनवे ट्रेंड येत असतात. आधी गिबली आर्टने धुमाकूळ घातला, तर आता सध्या थ्रीडी मॉडेल फोटोचे तरुणाईला वेड लागले आहे. अवघ्या काही सेकंदाच्या आता हे कोणत्याही फोटोचे थ्रीडी मॉडेलमध्ये रूपांतर करू शकतो. इन्स्टाग्राम असो की फेसबुक, कोणत्याही सोशल मीडिया साईडवर स्क्रोलिंग करताना तुम्हाला आजकाल तुमच्या मित्र - मैत्रिणींचे किंवा एखाद्या सेलिब्रिटीचे लूक असे थ्रीडी मॉडेल दिसत आहे. हे थ्रीडी मॉडेल कसे बनवायचे त्याबद्दल जाणून घेऊया. सर्वात पहिले तुमचा मोबाईल, लॅपटॉप किंवा कॉम्प्युटरवर क्रोम/ सफारी किंवा कोणतेही ब्राउझर उघडा आणि गुगल एआय सर्च टाईप करून सर्च करा. ते उघडल्यावर ट्राय गेमिनी हा ऑप्शन सिलेक्ट करा. तिथे तुम्हाला एक पॅनेलवर नॅनो बनाना (गेमिनी २.५ फ्लॅश इमेज) असे दिसेल,तो पर्याय निवडा आणि तुमच्या गुगल अकाऊंटने लॉग इन करा. पुढची प्रोसेस सुरू करण्यासाठी टर्म्स एक्सेप्ट करा. फोटो डाऊनलोड करा. हे सर्व झाल्यावर रनच्या शेजारी असलेल्या '+' आयकॉनवर क्लिक करा आणि अपलोड इमेज किंवा अपलोड फाईल सिलेक्ट करा. तुम्हाला ज्या फोटोचे थ्रीडी (३) मॉडेल हवे असेल तो फोटो (तुमचा, प्राण्यांचा किंवा कोणताही) तुम्ही तिथे अपलोड करू शकता. थ्रीडी प्रॉम्प्ट रन करा. यानंतर खाली दिलेला प्रॉम्प्ट कॉपी करून चॅटबॉक्समध्ये पेस्ट करा. आणि रन बटण दाबा. त्यानंतर एआय तुमची इमेज प्रोसेस करेल आणि एक थ्रीडी मॉडेल किंवा फिगर जनरेट करेल. डाऊनलोड आणि शेअर तुमचे थ्रीडी मॉडेल फोटो तयार झाल्यावर तुम्ही तो फोटो फ्री मध्ये डाऊनलोड करू शकता. त्यानंतर तुमचा हा क्यूट फोटो तुम्ही इन्स्टाग्राम,

फेसबुक, ट्विटर कुठेही शेअर किंवा पोस्ट करू शकता. मग बघा तुमच्याही युनिक क्रिएशनला लाईक्स मिळतील.

## तहसील कार्यालयासमोर ८४ वर्षाच्या वृद्धाचे उपोषण



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, पालम (परभणी) :** रविवार, दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी पालम तहसील कार्यालयासमोर विश्वनाथ देवकते राहणार कोष्टवादी तालुका लोहा येथील ८४ वर्षाचे वृद्ध इसम आमरण उपोषणाला बसले आहेत. त्यांची पालम तालुक्यातील मौजे वानवाडी येथील शेत शिवारात गट नंबर ९४/१ व ९४/३ या शेतामध्ये न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे तीन एकर हिस्सा इसवी सन २०२२ सालीच मिळाला तरीही आजपर्यंत जमीन त्यांच्या ताब्यात शासनाने दिलेली नाही.

सदरील प्रकरणात न्यायालयाचा हुकूमनामा बजावणीसाठी जिल्हाधिकारी परभणी यांच्याकडे तेव्हाच सन २०२२ वर्षी च पाठवलेला आहे. सदरील अंमलबजावणी ही नियमाप्रमाणे ६ महिन्याच्या आत करणे बंधनकारक असताना व कोणत्याही न्यायालयाचा स्टे नसताना सुद्धा विनाकारण कुठलीही कायदेशीर अडथळा किंवा आडकाठी नसताना हुकूमनामा बजावणी मध्ये जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले असल्याचा त्यांचा आरोप आहे. विश्वनाथ देवकते यांनी वारंवार जिल्हाधिकारी कार्यालयाकडे अर्ज करून सुद्धा काही उपयोग झालेला नाही.

त्यामुळे येत्या ७ दिवसाच्या आत जर न्यायालयाच्या हुकूमनाम्याची बजावणी करून सदरील तीन एकर जमिनीचा ताबा दिला नाही तर विश्वनाथ देवकते १४ सप्टेंबर पासून पालम तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार असल्याचे स्मरणपत्र दि.०८ सप्टेंबर रोजी देऊन सुद्धा, दि.१४ सप्टेंबर पर्यंत काहीही कार्यवाही झाली नाही. त्यामुळे पालम तहसील कार्यालयासमोर भर पावसात तंबू टाकून विश्वनाथ देवकते उपोषणाला बसले आहेत.

## शिवसेना ठाकरे गटाच्या महिला आघाडीने घातले दिवा शहरातील बंद पाण्याच्या टाक्यांचे श्राद्ध




**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१४, दिवा (ठाणे) :** दिवा शहरातील पाणीटंचाईच्या समस्येविरोधात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने जोरदार आंदोलन केले. गेल्या १२ ते १३ वर्षांपासून बंद असलेल्या दोन जलकुंभांचे श्राद्ध घालून शिवसेनेच्या महिला आघाडी व शिवसैनिकांनी प्रशासनाचा निषेध केला आणि पाणी समस्येकडे लक्ष वेधले.

*** बंद जलकुंभाचे 'श्राद्ध' घालून निषेध**

दिवा शहरातील बेतवडे येथे १२ते १३ वर्षांपूर्वी बांधलेले दोन जलकुंभ आजतागायत बंद आहेत. यामुळे शहरातील अनेक भागांत असमान पाणी वितरण होते शिवाय अनेक भागात पाणीटंचाई भेडसावत असते. याच विरोधात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या दिवा शहर महिला संघटिका ज्योती पाटील व महिला आघाडीच्या नेतृत्वाखाली हे अनोखे आंदोलन करण्यात आले.

महिला पदाधिकाऱ्यांपुढाकार घेत जलकुंभाचे 'श्राद्ध' घातले तर , कार्यकर्त्यांनी मुंडन करून आणि 'अंतिम संस्कार' करत प्रशासनाच्या निष्क्रियतेचा निषेध केला. यावेळी ज्योती पाटील यांनी प्रशासनावर प्रश्नांची सरबत्ती केली. जर या जलकुंभातून पाणीपुरवठा करायचाच नव्हता, तर ते कशाला बांधले? आणि त्यावर झालेला लाखो रुपयांचा खर्च कोणाकडून वसूल करणार? असे सवाल त्यांनी केले.

**नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली आंदोलन**

हे आंदोलन शिवसेना नेते आणि माजी खासदार राजन विचारे, जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे, जिल्हाप्रमुख केदार दिघे, सुभाष भोईर साहेब आणि जिल्हा संघटक तात्या माने यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. महिला जिल्हा संपर्कप्रमुख मृणाल यज्ञेश्वरी आणि महिला जिल्हा संघटिका वैशालीताई दरेकर-राणे यांच्या सूचनेनुसार या आंदोलनाची योजना आखण्यात आली. या आंदोलनात दिवा शहरातील अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते. अभिषेक ठाकूर (युवासेना), तेजस पोरजी (उपशहर प्रमुख), मारुती पडळकर (उपशहर प्रमुख), प्रियंका सावंत (समन्वयक), स्मिता जाधव (उपशहर संघटिका), उज्वला पाटील (उपशहर संघटिका), आणि शनिदास पाटील (शहर संघटक) यांचा समावेश होता. याव्यतिरिक्त, विभाग प्रमुख, महिला विभाग संघटिका, उपविभाग प्रमुख, शाखाप्रमुख, उपशाखा प्रमुख आदी महिला-पुरुष पदाधिकारी यांनी या आंदोलनात मोलाचे योगदान दिले.

## ठाणे महापालिका मुख्यालय येथे आंतरराष्ट्रीय स्वच्छ हवा दिनानिमित्त कार्यशाळा



**अक्षराज : तानाजी ताकतोडे**

**दि.१३, ठाणे :** वायू प्रदूषण कमी होऊन हवेची गुणवत्ता सुधारावी यासाठी महापालिकेसह विविध यंत्रणा प्रयत्नशील असतात. नागरिकांनीही त्या प्रयत्नांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा. म्हणजे सगळ्यांच्या योगदानातून हवा स्वच्छ राखणे शक्य येईल, असे प्रतिपादन ठाणे महापालिकेच्या प्रदूषण नियंत्रण विभागाने आयोजित केलेल्या कार्यशाळेत अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी केले.

घरच्या घरी कचऱ्याचे नियोजन करणे, सार्वजनिक वाहनांचा वापर करणे, झाडे लावणे व त्यांची काळजी घेणे अशा गोष्टींमधून सर्वसामान्य नागरिक आपापल्या परीने हवेची गुणवत्ता सुधारण्याच्या प्रयत्नात मदत करू शकतात. कोणतेही अभियान जेव्हा नागरिकांमार्फत पुढे नेले जाते तेव्हाच त्याला यश मिळते, असेही अतिरिक्त आयुक्त माळवी यांनी स्पष्ट केले. तसेच, ठाणे महानगरपालिकेतर्फे महाविद्यालय व शाळा यांच्यामध्ये माझी वसुंधरा अंतर्गत इ प्रतिज्ञा आणि त्यांची पूर्तता या स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार असल्याची घोषणा यावेळी त्यांनी केली. जास्तीत जास्त प्रतिज्ञांची नोंदणी करणाऱ्या महाविद्यालयांना सन्मानित करण्यात येणार आहे. त्याची सविस्तर माहिती लवकरच माहिती पर्यावरण विभागातर्फे देण्यात येईल, असेही ते म्हणाले.

मानवी आरोग्याचे रक्षण करण्यासाठी वायू प्रदूषण कमी करण्यासह हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी आणखी प्रयत्न करण्याची गरज आहे. त्यासाठी दरवर्षी आंतरराष्ट्रीय स्वच्छ हवा दिवस साजरा केला जातो. या वर्षी या दिवसाची संकल्पना, रेसिंग फॉर एअर म्हणजेच स्वच्छ हवेसाठी कृती आणि सामूहिक प्रयत्तांना गती ही आहे. त्यासाठी महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या निर्देशानुसार महापालिका अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, स्वयंसेवी संस्था आणि विद्यार्थी यांच्यासाठी कार्यशाळेच्या आयोजन करण्यात आल्याची माहिती मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान यांनी दिली. तसेच, राज्याच्या कृती आराखड्यानुसार ठाणे महापालिका क्षेत्रासाठीही कृती आराखडा तयार करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

महापालिका मुख्यालय येथील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे झालेल्या या कार्यशाळेत राज्य हवामान कृती कक्षाचे संचालक अभिजीत घोरपडे यांनी नागरी क्षेत्रासाठी हवामान कृती आराखडा याबद्दल मार्गदर्शन केले. नागरी भागातील आव्हाने आणि त्यांचा सामना करण्यासाठी योजण्यात आलेल्या उपायांची माहिती त्यांनी दिली. ठाणे महापालिकेने तयार केलेल्या उष्णता कृती आराखड्याचेही त्यांनी कौतुक केले.

तसेच, नागरी विभागातील हवा प्रदूषण नियंत्रणासाठी रस्त्यांची स्थिती, वाहतूक व्यवस्थापन, बांधकामांचे नियोजन आदी उपाययोजना आवश्यक असल्याचे प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या ठाणे विभागाचे उप प्रादेशिक अधिकारी संजीव रेडासनी यांनी सांगितले. महावितरण कंपनीतील कार्यकारी अभियंता अविनाश रणदिवे आणि सहाय्यक अभियंता किशोर सावरकर यांनी सौर उर्जेचा वापर वाढवण्याची आवश्यकता सांगितली. ठाण्यात १००० सोसायट्यांनी प्रधानमंत्री सर्यघर योजनेत सौर पॅनल बसविल्याचेही त्यांनी सांगितले.

तर, सोमय्या महाविद्यालयातील पर्यावरण विभाग प्रमुख डॉ. निलेश वाघ यांनी नागरी सहभागाचे महत्त्व विशद केले. त्याचबरोबर, ठाणे महापालिकेच्या उप पर्यावरण अधिकारी विद्या सावंत यांनी महापालिकेतर्फे हवा प्रदूषण रोखण्यासाठी केल्या जात असलेल्या उपायांची माहिती दिली.

## शिक्षकांवर भावी पिढी घडविण्याची जवाबदारी : आ.सचिन आहिर




**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.१३, वरळी :** मोबाईल, कॉम्प्युटर आणि AI च्या वाढत्या प्रभावी जमान्यात एक जवाबदार आणि सुसंस्कृत पिढी घडविण्याची व चांगला समाज निर्माण करण्याची जबाबदारी शिक्षकांवर येऊन पडली आहे.आणि शिक्षक प्रचंड काम करून सुद्धा नवसमाज घडविण्यात कुठेही मागे नाही. असे गौरवोदगार विधान परिषदेचे आमदार आणि उबाठा सेनेचे नेते सचिन आहिर यांनी व्यक्त केले. वरळी येथील डॉ. आंबेडकर भवन ट्रस्ट तर्फे दरवर्षी गुणवंत शिक्षकांना देण्यात येणाऱ्या आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

यावेळी पुढे बोलताना आमदार सचिन आहिर म्हणाले की सभागृहात माझ्या अवतीभोवती शिक्षक आमदारच बसलेले असतात आणि ते सातत्याने शिक्षकांचेच प्रश्न मांडत असतात. शिक्षकांनी शिकवल्यामुळेच मीही आमदार,मंत्री होऊ शकलो. सध्याच्या काळात शिक्षकांना अनेक ऑनलाईन कामे आहेत, ती सुद्धा आज-आत्ता-ताबडतोब या गतीने.परंतु शिक्षक कामाचा त्रास झाला म्हणून कधीच तक्रार करीत नाहीत. शालेय अभ्यासक्रम आणि शाळाबाह्य कामे यातून विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याचे चॅलेंज शिक्षक स्वीकारतात आणि ते पेलतात देखील. समाजातल्या या गुणी व होतकरू शिक्षकांना हेरून त्यांच्या कामाची दखल घेऊनच डॉ.आंबेडकर भवन ट्रस्ट दरवर्षी शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करते. आणि या सन्मान सोहळ्याला स्वतः मला हजर राहून शिक्षकांचा सन्मान करण्याची संधी मिळते ते माझे भाग्य समजतो. शिक्षकांच्या प्रश्नावर मी कधीही आवाज उठवायला तयार असून गरज पडल्यास या कामी राज्याचे मुख्यमंत्री, शिक्षणमंत्री यांची भेट घेऊ.

यावेळी विचार मंचावर डॉ आंबेडकर भवन ट्रस्टचे अध्यक्ष सतिश चव्हाण, प्रशासकीय अधिकारी भंडारे, वरळी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अशोक कांबळे हे उपस्थित होते.

तत्पूर्वी आमदार सचिन आहिर आणि इतर मान्यवरांच्या हस्ते महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

यावेळी ट्रस्ट तर्फे निवड करण्यात आलेल्या एकूण साठ गुणवंत शिक्षकांना मान्यवरांच्या शुभहस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले.

सुंदर ट्रॉफी, मेडल, प्रमाणपत्र, शाल व पुष्पगुछ देऊन शिक्षकांना सन्मानित करण्यात आले.हा पुरस्कार प्राप्त झालेल्या शिक्षकांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहताना दिसून आला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे सचिव सतीश खरात, सुरेंद्र उबाळे, दैनिक अक्षराज चे पत्रकार प्रभाकर हजारे, वाहतूक पोलीस जितेंद्र यादव, माता रमाई महिला मंडळाचे सर्व पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सेवानिवृत्त मुख्याध्यापक अनंत पाटील यांनी केले.शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्र विद्यालय अव्वल



**अक्षराज : दिवाकर घेर,**

**दि.१४, नागपूर :** सावनेर येथील हरिभाऊ आदमने महविद्यालय येथे संपन्न झालेल्या सावनेर तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेमध्ये महाराष्ट्र विद्यालय खापरखेडा येथील १९ वर्षे वयोगटातील मुलांच्या संघाने उल्लेखनीय कामगिरी करून प्रथम क्रमांक प्राप्त केला.

यामध्ये तुषार मारबते, यश गोमकाळे, आदित्य शेंडे, वैभव भड, मंथन खैरकर, प्रांजल बर्वे, प्रशांत भुरे, प्रथमेश उके, पियुष उके, तेजस गजभिये, संकेत चांदेकर व नमन खिळेकर

तसेच १९ वर्षे वयोगटातील मुलींच्या संघाने सुद्धा व्दितीय क्रमांक प्राप्त केला. यामध्ये शालिनी मारबते, तृप्ती मारबते, राजनंदिनी शिवारे, कृतिका असोले, पलक मेश्राम, रिया गुंडाणे, सुहानी गोंडाळे, रागिनी बले, कावेरी बले, दिव्या बागडे, सिध्दि शिंदे व खुशी बर्वे यांचा सहभाग होता.

महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्थेचे व माजी मंत्री सुनील केदार, सचिव सुहासताई केदार, सुधिर केदार व संस्थेचे सर्व पदाधिकारी, विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण वडस्कर, उपमुख्याध्यापक चंद्रशेखर लिखार, प्रा.विजय टेकाडे, प्रा.दिगांबर आडे, क्रीडा शिक्षक धर्मेंद्र सुर्यवंशी, धैर्यशील सुटे, व सर्व शिक्षक व कर्मचारी वर्गाने खेळाडूंचे अभिनंदन केले.

# रस्त्यांपासून घरांपर्यंत, जनतेच्या हक्कासाठी 'सेवा पंधरवडा'...

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१४, विंचूर (नाशिक) :** निफाड तालुक्यात दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसापासून ते ०२ ऑक्टोबर २०२५ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीपर्यंत **'सेवा पंधरवडा'** उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज महाराज स्वअभियानांतर्गत हा विशेष उपक्रम राबवला जाणार असून, महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम, गतिमान आणि पारदर्शक करण्याचा उद्देश या उपक्रमामागे आहे. याबाबत प्रांताधिकारी डॉ.शशिकांत मंगरुळे व तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी सविस्तर माहिती दिली.

**पहिला टप्पा : पाणंद रस्ते अभियान (१७ ते २२ सप्टेंबर)**

शिवार व पाणंद रस्त्यांना क्रमांक देणे.

गाव नकाशावर सर्व रस्त्यांचे स्पष्ट चिन्हांकन.

नोंद नसलेल्या रस्त्यांचा सर्वेक्षण करून समावेश.

शेतरस्त्यांसाठी शेतकऱ्यांची संमत्तीपत्रे घेणे.

रस्ता अदालत घेऊन प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे.

शेतरस्त्यांची मोजणी व सीमांकन करून हक्क स्पष्ट करणे.

**दुसरा टप्पा : सर्वांसाठी घरे (२३ ते २७ सप्टेंबर)**

शासकीय जमिनीवर कब्जेहक्क देऊन गोरगरीबांना घरकुल उपलब्ध करून देणे.

गायरान जमिनीवरील अतिक्रमणांना नियमानुसार कायदेशीर स्वरूप.

विकास आराखड्याशी विसंगत असलेल्या आरक्षण बदलाचे प्रस्ताव सादर करणे.

पात्र लाभार्थ्यांना पट्टे वाटप.

खासगी मिळकतींसाठीही पट्टे वितरणाची प्रक्रिया



**तिसरा टप्पा : नावीन्यपूर्ण उपक्रम (२८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर)**

१. गाव तिथे स्मशानभूमी – प्रत्येक गावात स्वतंत्र स्मशानभूमीची सोय.

२. महसूल अदालत – नागरिकांच्या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा.

३. कार्यालयीन स्वच्छता – महसूल कार्यालयीन कामकाजात पारदर्शकतेसह स्वच्छता मोहिम.

४. आयुष्मान कार्ड – नागरिकांना आरोग्य विमा योजनेचा थेट लाभ.

प्रांताधिकारी डॉ.मंगरुळे यांनी सांगितले की, सेवा पंधरवडा हा केवळ दोन आठवड्यांचा उपक्रम नसून महसूल प्रशासनाच्या कामकाजात सातत्याने पारदर्शकता व गतिमानता आणण्याचे प्रभावी माध्यम आहे. याचा थेट लाभ सामान्य जनतेला होणार आहे.

तर तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी आवाहन केले की, प्रत्येक गावातील नागरिकांनी सक्रिय सहभाग घेऊन शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा. रस्ते असो वा घरे, प्रत्येक टप्प्यातील उपक्रमांचा फायदा थेट जनतेपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न प्रशासन करणार आहे.

निफाड तालुक्यातील नागरिकांना या सेवा पंधरवड्यात शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळणार असून, गावागावातून मोठ्या संख्येने सहभाग अपेक्षित आहेत.

# नवी मुंबई विमानतळाला दि.बा.पाटील यांचे नाव द्यावे

## या मागणीकडे लक्ष वेधण्यासाठी खासदार म्हात्रे यांच्या नेतृत्वात भव्य कार रॅली

**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.१४, शहापूर, ठाणे :** नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते स्व.दि.बा.पाटील यांचे नाव द्यावे. या मागणीसाठी भिवंडी लोकसभा मतदार संघाचे खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांच्या नेतृत्वाखाली रविवार, दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी भिवंडी ते नवी मुंबई कार रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या कार रॅलीला स्थानिक भूमिपुत्रांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून हजारो नागरिक या कार रॅलीत सहभागी झाले होते.



मानकोली डोंबिवली रस्त्यावर आयोजित केलेल्या कार्यक्रमात स्व. दि.बा.पाटील यांच्या प्रतिमा पुष्पहार अर्पण करून सुरू झालेल्या या रॅलीत ठाणे जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते आर सी पाटील, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपनेते विश्वास थळे, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष डी.के.म्हात्रे, शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हा प्रमुख कुंदन पाटील, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्या महिला जिल्हाध्यक्ष डॉ.रूपाली कराळे, माजी जिल्हा परिषद सदस्या शारदा सुरेश म्हात्रे यांसह मोठ्या संख्येने भिवंडी तालुक्यातील बहुजन समाज बांधव हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

नवी मुंबई विमानतळाला दि.बा. पाटील यांचे नाव द्यावे. या मागणीसाठी सुरुवातीपासूनच ठाणे, रायगड, पालघर, मुंबई, नवी मुंबई भूमिपुत्र आगरी कोळी समाज सुरुवातीपासून आग्रही आहे. महाराष्ट्र शासनाने सुद्धा विमानतळाला दि.बा.पाटील यांचे नाव देण्याचा प्रस्ताव केंद्राकडे पाठवला असताना केंद्र शासनाकडून याबाबत अजूनही चाल ढकल केली जात आहे. यामुळे समजता प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली आहे. केंद्र शासनाचे लक्ष वेधण्यासाठी या कार रॅलीचे आयोजन करण्यात आले असल्याची प्रतिक्रिया यावेळी खा.बाळ्या मामा यांनी दिली आहे.

विमानतळास स्व.दि.बा.पाटील यांचे नाव देण्याच्या मागणीसाठी, केंद्र सरकारला जागे करण्यासाठी या रॅलीचे आयोजन करण्यात आले असून ठाणे व रायगड जिल्ह्यातून या चांगला प्रतिसाद भूमिपुत्रांसह बहुजन समाजाचा मिळाला आहे. आम्हाला खात्री आहे. या आंदोलनाची दखल केंद्र सरकार घेऊन तत्काळ नामकरण करण्याबाबत सकारात्मक निर्णय घेईल. यामध्ये केंद्र सरकारने काही काळेबेरे केल्यास हा लढा अधिक तीव्र करून उद्घाटन सोहळा होऊ देणार नाही असा इशारा खासदार बाळ्या मामा यांनी यावेळी दिला आहे.

या आंदोलनास वंचित बहुजन आघाडी भिवंडी शहरावतीने अध्यक्ष प्रदीप शिर्के यांनी जाहीर पाठिंबा व्यक्त करणारे पत्र खासदार बाळ्या मामा यांना दिले. तर या रॅलीत अनेक संस्था संघटनांनी सहभाग घेतला होता. विशेष म्हणजे या रॅलीचे तालुक्यातील मानकोली, हायवे दिवे पाठोपाठ खारेगाव, कळवा, विटावा या ठिकाणी स्थानिक भूमिपुत्रांनी जल्लोषात पारंपरिक वेशभूषेसह महिलांनी कोळी नृत्य सादर करून स्वागत केले.

# बीजेएस महाविद्यालयाचा कॅडेट कॅप्टन राठोड याची राष्ट्रीय नौसैनिक शिबिरात दमदार कामगिरी



**अक्षराज : भुषण बावचीकर**

**दि.१३, वाघोली (पुणे) :** भारतीय जैन संघटनेच्या (बीजेएस) कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचा तृतीय वर्ष वाणिज्य शाखेतील विद्यार्थी आणि ३ महाराष्ट्र नेव्हल युनिट एनसीसीचा कॅडेट कॅप्टन पवन राठोड याने लोणावळा येथील आयएनएस शिवाजी येथे आयोजित अखिल भारतीय नौसैनिक शिबिर २०२५ मध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करताना उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

देशभरातील १.५ लाख एनसीसी कॅडेट्समधून निवडक ६०० कॅडेट्सच्या या शिबिरात पवनने शिप मॉडेलिंग स्पर्धेत आपल्या अप्रतिम कौशल्याने सर्वांचे लक्ष वेधले. दिनांक ०२ सप्टेंबर २०२५ रोजी मेजर जनरल विवेक त्यागी, एडीजी एनसीसी, महाराष्ट्र यांच्या हस्ते या शिबिराची सुरुवात झाली. दिनांक १२ सप्टेंबरपर्यंत चालणाऱ्या या शिबिरात १७ एनसीसी संचालनालयांमधील कॅडेट्स सहभागी आहेत.

नौदल जीवनाचा अनुभव, नेतृत्वगुणांचा विकास, संघभावना आणि शारीरिक-मानसिक क्षमता वृद्धी हा शिबिराचा उद्देश आहे. कॅडेट्सना बोट पुलिंग, शिप मॉडेलिंग, ड्रिल, व्हेलर-बोट रीगिंग, सेमाफोर, सेवा स्पर्धा आणि कार्यशाळा यांसारख्या उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली. महाराष्ट्रातून शिप मॉडेलिंग स्पर्धेसाठी फक्त ३ कॅडेट्स निवडले गेले. त्यापैकी पवन राठोड एक होता. गेल्या ६ महिन्यांपासून त्याने या स्पर्धेसाठी अथक सराव आणि मेहनत घेतली. शिप मॉडेलिंग ही तांत्रिक आणि सर्जनशील स्पर्धा असून, यात जहाजाच्या अचूक प्रतिकृती तयार करणे आणि त्याची कार्यक्षमता सिद्ध करणे आवश्यक आहे.

पवनला प्रशिक्षक ऋतुजा कणसे (पुणे), उद्धव कबीर (रत्नागिरी), राजू खान, अमानदीप सिंग, मुख्य प्रशिक्षक निखिल मोरे, एएनओ लेफ्टनंट कमांडर प्रा.प्रमोद शिंदे आणि लेफ्टनंट कमांडर सुदर्शन भूषण यांचे मार्गदर्शन लाभले. पवनच्या या यशामुळे बीजेएस महाविद्यालय आणि महाराष्ट्राचा गौरव राष्ट्रीय स्तरावर वाढला आहे. एनसीसी युनिटचे अधिकारी सब लेफ्टनंट डॉ. शिवाजी सोनवणे, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.डॉ.बळवंत लांडगे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय गायकवाड, कार्यकारी अधिकारी डॉ. रवींद्रसिंह परदेशी, वाघोली शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्पाचे व्यवस्थापक सुरेशजी साळुंके, ३ महाराष्ट्र नेव्हल युनिटचे कमांडिंग ऑफिसर कमांडर आपलेश मोहन आणि बीजेएस व्यवस्थापन समितीने पवनचे अभिनंदन केले आहे.

सहकारी विद्यार्थ्यांनी ही त्याला शुभेच्छांचा वर्षाव केला. पवनच्या कठोर परिश्रम आणि समर्पणाने बीजेएस महाविद्यालय आणि महाराष्ट्राचा झेंडा राष्ट्रीय स्तरावर फडकवला आहे. त्याच्या यशाने तरुणांना मेहनत, शिस्त आणि समर्पणाचे महत्त्व पटवून दिले असून, त्याच्या पुढील प्रवासासाठी सर्वांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# ९५० जणांच्या मोबाइलवर पहिल्याच दिवशी चलान

## ४५३ दुचाकी चालकांना बजावले चलान

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१४, ठाणे :** वाहतुकीला शिस्त लागावी यासाठी ठाणे वाहतूक पोलिसांनी आता सीसीटीव्ही कॅमेरांच्या मदतीने नियमभंग करणाऱ्यांवर करडी नजर ठेवण्यास सुरुवात केली.



या उपक्रमाची सुरुवात कॅडबरी सिग्नल येथे करण्यात आली असून, पहिल्याच दिवशी तब्बल ९५० चालक नियम मोडताना कैद झाले. सर्वाधिक ४५३ दुचाकीस्वार हेल्मेटशिवाय आढळले, तर ४२४ जणांनी सिग्नल तोडला. याशिवाय ४२ जण स्टॉपलाइन ओलांडताना व इतर ३१ विविध नियमभंग करताना आढळले.

या सर्वांना थेट त्यांच्या मोबाइलवर दंडाच्या चालानची नोटीस पाठवण्यात आली आहे, अशी माहिती वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त पंकज शिरसाट यांनी दिली.

नियमभंग करणाऱ्या २० जणांनी दंडाची रक्कम भरून शिस्त दाखवली. कॅडबरी सिग्नलवर प्रयोग यशस्वी झाल्यानंतर पुढील टप्प्यात इतर १५ महत्त्वाच्या ठिकाणी अशाच पद्धतीने कॅमेरे बसवले जातील.

# थोडक्यात

## मुदखेड राष्ट्रवादी काँग्रेस वंचित बहुजन कार्यकर्त्यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**



**दि.१४, मुदखेड (नांदेड) :** राष्ट्रवादी युवक काँग्रेस अजित पवार गटाचे शहाराध्यक्ष मुकेश कांबळे वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख पिंटू चौंदते यांच्यासह असंखय कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला असून आगामी निवडणूकीत काँग्रेस पक्षाच्या झेंडा फडकिवण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी केला आहे. काँग्रेस पार्टी कार्यालयात रविवार, दि.१४ सप्टेंबर २०२५ रोजी पक्षप्रवेश सोहळ्याचे तसेच मेळावा पूर्वतयारीसाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते काँग्रेस पार्टी तालुकाध्यक्ष प्रताप देशमूख बारडकर हे अध्यक्षस्थानी होते. काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष कैलास गोडसे, माजी उपाध्यक्ष करीम खाँ साब, जिल्हा उपाध्यक्ष राजु चौंदते, सहसचिव गिरीष कोत्तावार, जिल्हा उपाध्यक्ष हाजी इलियास अब्बासी अनुसूचित जाती मागासवर्गीय सेलचे शहराध्यक्ष ऋषीकेश चौंदते, काँग्रेसचे ज्येष्ठ कार्यकर्ता तेजाब पाटील मुंगल, युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रशांत पाटील मुंगल, शहराध्यक्ष मुजीब पठाण, काँग्रेस शहर उपाध्यक्ष सूर्यकांत चौंदते, शहर सचिव अतीक अहेमद, गजानन संबोड, संचालक महंमद शरीफ, शहर उपाध्यक्ष महंमद खदीर, भगवान पवार,

अविनाश चौंदते, संजय बोकेफोड ,बाळू क्षिरसागर, यशवंत रणखांबे, मोइन फूलवाले, बालाजी शिंद, युवक सरचिटणीस आकाश सोनटक्के, बंडू पाटील, रमेश बोडके, माधव चमकूरे, युवक उपाध्यक्ष वेदांत शेवटे, भिमराव महादवाड, कूलदिप मल्लेवार, मारोती गाढे, साई बोथंले, माधव बोकेफोड, काशिराम बोकेफोड, लतीफ टेलर्स यांच्यासह आदींची उपस्थिती होती. काँग्रेस पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी आगामी निवडणुकांची रणसिंग फुंकले लोकसभेतील काँग्रेस पक्षाचे नेते तथा विरोधी पक्ष नेते राहुल गांधी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मलिकार्जुन खरगे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाला बळकट करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. राज्याचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, नांदेड जिल्ह्याचे खासदार रवींद्र चव्हाण यांच्या सूचनेवरून तालुक्यांतील प्रत्येक गावात काँग्रेस पक्षाचे ध्येय धोरणे सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी सर्वधर्म सर्व समभाव रुजून यासाठी अभियान राबविण्याचा निर्धार केला आहे.

## बंजारा समाजाच्या आरक्षणासाठी पायी वारी करणाऱ्या युवकांचे विंचूरमध्ये स्वागत

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**




**दि.१४, विंचूर (नाशिक) :** कन्नड तालुक्यातील आंबा तांड्याचे सचिन चव्हाण व देवचंद राठोड हे बंजारा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी पायी यात्रा करीत मुंबईकडे प्रस्थान करत आहेत. या यात्रेचा टप्पा विंचूर येथे आल्यानंतर गावातील नागरिक व सामाजिक संघटनांनी त्यांचे मनःपूर्वक स्वागत केले. बंजारा समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गात आरक्षण मिळावे, ही समाजाची गेल्या अनेक वर्षांची मागणी आहे. परंतु शासनाकडून अद्याप याबाबत ठोस निर्णय होत नसल्याने समाजातील युवकांनी आरक्षणासाठी पायी यात्रा सुरू केली आहे.कन्नड तालुक्यातील आंबा तांडा येथून सुरू झालेली ही यात्रा मुंबईतील मंत्रालयात मुख्यमंत्री यांना निवेदन देऊन पूर्ण होणार आहे. विंचूरमध्ये प्रवेश करताच नागरिकांनी पुष्पहार घालून व जल्लोषात सचिन आणि देवचंद राठोड यांचे स्वागत केले. स्वागत सोहळ्यात स्थानिक युवक, ग्रामस्थ, महिला मंडळ तसेच सामाजिक संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना सचिन राठोड म्हणाले, आरक्षण हा आमचा हक्क आहे. शासनाने तातडीने समाजाच्या मागणीवर तोडगा काढावा. महाराष्ट्रातील बंजारा समाजाला न्याय मिळेपर्यंत आमची ही पायी यात्रा सुरू राहील. देवचंद राठोड यांनी सांगितले की, आमचा समाज वंचित व उपेक्षित आहे. शासनाने तातडीने समाजाचा इतिहास व सामाजिक स्थिती विचारात घेऊन अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश करावा. अन्यथा आमचा लढा अधिक तीव्र होईल. या स्वागतप्रसंगी विंचूर शहरातील नागरिकांनी ही आपले समर्थन दर्शवले. समाजाच्या न्याय्य मागणीसाठी युवकांनी पायी यात्रा सुरू करून धाडस दाखवले आहे. त्यांना यश मिळावे, अशीच आमची इच्छा आहे, असे अनेक ग्रामस्थांनी व्यक्त केले. बंजारा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीला पाठिंबा दर्शवण्यासाठी ही यात्रा विंचूर सह अनेक गावांत थांबणार असून ठिकठिकाणी नागरिकांकडून चांगलाच प्रतिसाद मिळत आहे.

## राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत मिरा भाईंदर मनपाच्या संघाचे चमकदार यश

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**



**दि.१३, मिरा भाईंदर :** नेताजी सार्वजनिक वाचनालय, पढेगाव येथे दिनांक ०३ ते ०९ सप्टेंबर २०२५ दरम्यान पार पडलेल्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत मिरा भाईंदर महानगरपालिका कबड्डी संघाने उत्कृष्ट कामगिरी करत द्वितीय क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय यशाबद्दल मनपा आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ.शर्मा (भा.प्र.से.) यांनी संपूर्ण संघाचे विशेष अभिनंदन करत त्यांचे मनःपूर्वक कौतुक केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. स्पर्धेतील प्रत्येक सामन्यात खेळाडूंनी दाखवलेली चिकाटी, आणि कौशल्यपूर्ण खेळ यामुळे महानगरपालिका कबड्डी संघाने आपले वेगळेपण सिद्ध केले. यशाच्या या टप्प्यावर मनपा आयुक्तांनी कबड्डी संघाची विशेष भेट घेत त्यांच्याशी संवाद साधला आणि त्यांचे मनोबल वाढवले.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्रीडा विभागाने एकूण १५ कबड्डीपटूंना अधिकृतपणे दत्तक घेतले आहे. या खेळाडूंना व्यावसायिक पातळीवर प्रशिक्षण मिळावे यासाठी या संघाला अनुभवी प्रशिक्षक,तज्ज्ञ फिटनेस ट्रेनर, प्रोफेशनल फिजिओथेरपिस्ट यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या कबड्डी संघामुळे क्रीडा क्षेत्रात गुणवत्ता वाढवण्याचा मनपाचा प्रयत्न यशस्वी ठरत आहे. आयुक्तांकडून मिळालेल्या प्रोत्साहन व शुभेच्छांमुळे संघातील खेळाडूंना नवचैतन्य मिळाले आहे, अशी भावना कबड्डी संघाने व्यक्त केली. पुढील स्पर्धांमध्ये आणखी चांगली कामगिरी करून महानगरपालिकेचे नाव उज्ज्वल करण्याचा निर्धारही त्यांनी यावेळी व्यक्त केला. मिरा भाईंदर महानगरपालिका खेळ व क्रीडा क्षेत्रातील गुणवत्ता वृद्धीसाठी सदैव कटिबद्ध आहे. खेळाडूंना व्यासपीठ, संसाधनं आणि योग्य मार्गदर्शन देणे हाच मनपाचा खरा उद्देश आहे असे महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांनी सांगितले आहे.